ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २० | पुणें, बुधवार तारीख २२ डिसेंबर, १९५४ | अंक ४६

## विविध माहिती

**जंगल-परिषदेचें स्मारक**—जागतिक जंगल-परिषदेचें चौथें अधिवेशन डेहराडून येथें भरलें होतें. ह्या घटनेचें स्मारक म्हणून तेथील जंगल-विषयक संशोधनसंस्थेच्या आवारांत एक बगीचा तयार करण्यांत येणार आहे. ज्या ज्या देशांनीं परिषदेला प्रतिनिधी पाठविले त्या त्या देशांतील विशेष प्रकारचीं झाडें ह्या बागेंत लावण्यांत येणार आहेत.

**केबल फॅक्टरीच्या उत्पादनाला प्रारंभ**—प. बंगालमधील रूपनारायणपूर ह्या ठिकाणीं हिंदुस्थान केबल फॅक्टरी ह्या कारखान्याची इमारत आतां बांधून पूर्ण झाली आहे. कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनास सुरवात ता. २६ डिसेंबरपासून होणार आहे. कारखाना बांधण्यास १·३० कोटी रुपये खर्च आला. त्यांत दरवर्षी ४७० मैल लांबीच्या टेलिफोनच्या तारा तयार होऊं शकतील.

**प्रवास करण्याची हौस वाढविण्यासाठी**—भारतांत प्रवास करण्याची हौस वाढविण्यासाठी एक पंचवार्षिक कार्यक्रम आखण्यांत आला आहे. कार्यक्रमाची चर्चा करण्यासाठी सर्व राज्य सरकारांच्या प्रतिनिधींची परिषद दिल्ली येथें नुकतीच भरविण्यांत आली होती. परिषद भारतीय सरकारच्या वाहतूक-खात्यातर्फे भरविण्यांत आली.

**कच्छमधील पाटबंधाऱ्याच्या योजना**—भारतीय सरकारनें कच्छमध्यें बांधण्यांत यावयाच्या १५ पाटबंधाऱ्यांच्या योजनांना मंजुरी दिली आहे. ह्या सर्व योजनांना मिळून ५,५०,००० रुपये खर्च येईल. ही रकम जमेस धरून चालू सालीं कच्छमधील पाणी-पुरवठ्याच्या योजनांवर २४,४७,००० रुपये खर्च होतील.

**औरंगाबाद येथें कलाप्रदर्शन**—डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत औरंगाबाद येथें अखिल-हैद्राबाद कलाप्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत प्राचीन व अर्वाचीन अशा दोन्ही प्रकारच्या कलेचे नमुने ठेवण्यांत येणार आहेत. औरंगाबाद आर्ट सर्कलतर्फे प्रदर्शनाची योजना आखण्यांत आली आहे.

**समाज-हित केंद्रांची माहिती**—भारतांत समाज-हित संवर्धन करणारीं १५,००० केंद्रें आहेत. ह्या केंद्रांची व त्यामधून चालणाऱ्या कार्यांची माहिती देणारी एक मार्गदर्शिका २६ जानेवारी रोजीं प्रकाशित करण्यांत येणार आहे. मार्गदर्शिका १,००० पृष्ठांची होईल व तींत अत्यंत उपयुक्त माहिती देण्यांत येईल.

**सीलोनमध्यें तेलाचा कारखाना**—कोलंबोपासून १५ मैलांवर तेल शुद्ध करण्याचा एक कारखाना काढण्याच्या वाटाघाटी ॲंग्लो-ॲंग्लोइराणिअन कंपनी सीलोनच्या सरकारशीं करित आहे. कारखाना काढण्याच्या कामीं सिलोनचें सरकार कांहीं भांडवल घालणार नाहीं.

**अजमीरला रेडिओ केंद्र**—अ. भारतीय रेडिओनें रेडिओ-केंद्रांची संख्या वाढविण्याचा जो कार्यक्रम पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केला आहे, त्यांत अजमीरजवळ २० किलोवॅट शक्तीचें रेडिओ केंद्र उघडण्याची एक योजना आहे, असें समजतें. हें केंद्र जयपूर केंद्राला जोडण्यांत येणार असून तें सप्टेंबर, १९५५ पर्यंत चालू होईल असें समजतें.

**स्टेशनांवरील वेटिंगरूम्स**—१९५४-५५ ह्या सालांत ३७ स्टेशनांवर नव्या वेटिंगरूम्स बांधण्याचा अगर असलेल्या वाढविण्याचा विचार प. रेल्वेतर्फे चालू आहे असें समजतें. १९५५-५६ सालीं ४१ स्टेशनांवरील वेटिंगरूम्सबाबत अशाच प्रकारच्या सुधारणा करण्यांत येणार आहेत.

**नद्यांच्या प्रवाहांची पहाणी**—उत्तर प्रदेश सरकारनें राज्यांतील गंडकी, गंगाप्रभृति ह्या चार नद्यांच्या प्रवाहाची पहाणी करण्याचें कार्य चालू केलें आहे. ह्या नद्यांना येणाऱ्या पुरांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीनें विस्तृत प्रमाणावर तपासणी करण्यांत येत आहे. तपासणी पुरी झाल्यावर पूर-नियंत्रणाच्या प्रत्यक्ष कामाला प्रारंभ होईल.

**शैक्षणिक कार्यांत सुडानला मदत**—भारतामधील सुप्रसिद्ध शिक्षण-तज्ज्ञ मि. के. जी. सय्यदीन ह्यांची मदत सुडान एज्युकेशन कमिशनला देण्याचें भारतीय सरकारनें कबूल केलें असल्याचें समजतें. सुडान एज्युकेशन कमिशनच्या अध्यक्षाचें काम करण्यासाठीं ते पुढील महिन्यांत खार्टुमला रवाना होणार आहेत.

**जपानचें आर्थिक महत्त्व**—आशिआंतील देशांना कम्युनिझमपासून वाचविण्यासाठीं अमेरिका जो आर्थिक मदतीचा कार्यक्रम तयार करीत आहे, त्याचें काम जोरानें चालू झालें आहे. आर्थिक मदतीच्या कार्यक्रमास यश येण्यासाठीं जपानला आपला वाटा उचलूं दिला पाहिजे, असें मत अमेरिकन अधिकारी व्यक्त करीत आहेत.

**नवीन तेलवाहू बोटी**—भारतीय सरकार तेलाची वहातूक करणाऱ्या दोन बोटी मिळविण्याच्या खटपटींत आहे अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. त्यांपैकीं एक बोट विझगापट्टम येथील गोदींत बांधण्यांत येणार असून दुसरी परदेशाकडून विकत घेण्यांत येणार आहे.

**हंगेरीशीं व्यापारी करार नाहीं**—हंगेरीअन सरकारचें एक व्यापारी प्रतिनिधी-मंडळ भारतांत आलें होतें. मंडळानें २ कोटी रुपये किंमतीचा भांडवली स्वरूपाचा माल उधारीनें पुरविण्याची तयारी दाखविली होती. परंतु भारत सरकारनें हा व्यापारी करार करण्याचें नाकारलें असल्याचें समजतें. आतां कांहीं खाजगी भांडवलवाले ह्या सवलतीचा फायदा घेण्याच्या प्रयत्नांत आहेत.

## दि कोरेगांव को. पीपल्स बँक लि. चा रौप्यमहोत्सव

दि कोरेगांव को. पीपल्स बँकेचा रौप्यमहोत्सव दि. ४ डिसेंबर रोजीं ना. यशवंतरावजी चव्हाण ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्याप्रसंगीं श्री. व्ही. पी. वर्दे ह्यांच्या हस्तें रौप्यमहोत्सव पुस्तिकेचें प्रकाशन जाहीर करण्यांत आलें. २५ वर्षापूर्वी श्री. गणेश रामचंद्र कुलकर्णी ह्यांनीं कोरेगांवकरांची अडचण ओळखून, बँकेची स्थापना केली; श्री. अनंत गंगाधर एरंडे प्रभृति सहकारी जमविले व डॉ. बी. एस्. देशपांडे ह्यांच्या त्यावेळच्या दवाखान्याच्या माडीवर ४ डिसेंबर, १९२९ रोजीं संस्थेच्या स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली गेली. जात, पात व पंथभेद न पहाणें, हें संस्थेचें वैशिष्ट्य होतें व त्यामुळें तिची वाटचाल सुखकर झाली. प्रस्तुत संकलित वृत्तांतांत बँकेच्या स्थापनेची व वाढीची माहिती संगतवार आणि मोठ्या आत्मीयतेनें दिलेली आहे. आज तिचें भाग भांडवल सुमारें ७५ हजार रुपये असून तिच्या ५ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं बँकेचें स्वतःचें भांडवल सवा लाखाच्या आसपास आहे. ही भक्कम परिस्थिति प्राप्त करून देणारांबद्दल बँकेच्या ठेवीदारांना कृतज्ञताच वाटत असली पाहिजे. बँकेच्या यशाची मीमांसा वृत्तांत खालीलप्रमाणें करण्यांत आली आहे:—

(१) बँकेच्या संस्थापकांचा दूरदर्शीपणा. त्यांनीं तिची उभारणी निधर्मी पायावर केली.

(२) बँकेचें उद्दिष्ट व तिचें कार्यक्षेत्र विशिष्ट वर्गाकरितां नव्हे, तर समाजांतील सर्व वर्गांना तिचा फायदा घेतां यावा असा तिच्या चालकांचा व्यापक दृष्टिकोन.

(३) सवलतीच व्याजाचे दर. त्याचप्रमाणें नियमाच्या कक्षेंत गरजू कर्जदारांच्या गरजा जास्तींत जास्त प्रमाणांत भागविण्याकडे लक्ष.

(४) सिल्व्हर ज्युबिली डिपॉझिट, नॉमिनल मेंबरशिप, होम सेव्हिंग्ज यांसारख्या दूरदर्शी योजना.

(५) व्यवहारविषयक धोरण.

(६) सुविद्य अनुभवी चालकवर्ग.

(७) कामसू तसाच कष्टाळू नोकरवर्ग.

(८) ग्रामस्थांची सक्रीय सहानुभूति आणि सहकारी सभासदांचें निरपेक्ष साहाय्य.

(९) कर्जदारांची वेळींच कर्जफेडीची तत्परता.

(१०) देवघेवीच्या व्यवहारांचा चोख हिशेब.

(११) खेळत्या भांडवलाशीं शेंकडा १ टक्का एवढेंच प्रमाण असणारा काटकसरीचा काटेकोर खर्च.

संकलित वृत्तांतांत, संस्थेच्या यशास हातभार लावणाऱ्या सर्वांची ओळख करून देण्यांत आली आहे; साध्या शिपायापासून संस्थापकांच्या कार्याचा योग्य प्रकारें गौरव केलेला आहे. तपशीलवार आकड्यांचीं परिशिष्टें शेवटीं जोडलीं आहेत आणि अनेक चित्रांनीं व सुंदर मुखपृष्ठानें वृत्तांतास शोभा आलेली आहे. वृत्तांताच्या छपाईचें सर्व काम कोरेगांव येथेंच केलेलें असून तें उत्कृष्ट दर्जाचें झालेलें आहे. आम्हीं बँकेस अधिकाधिक सुयश चिंतितों.

---

### हिंदी आर्थिक परिषद

अखिल भारतीय आर्थिक परिषदेचें ३७ वें वार्षिक अधिवेशन आग्रा येथें २२ ते २४ डिसेंबरअखेर भरणार आहे. मद्रास विद्यापीठाचे डॉ. बाळकृष्ण हे अध्यक्ष आहेत.


# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल | रु. १२,५०,००० |

मुख्य कचेरी :—४५५ रविवार, पुणें

शाखा:—(१) सदाशिव पेठ, पुणें १
(२) भवानी पेठ, पुणें २.
(३) सोलापूर (४) सांगली

★

पुणें व सांगली येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

★

जी. जी. साठे, मॅनेजर
डी. आर. नाईक जे. पी., चेअरमन

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,१७,००० |
| ठेवी | रु. ९६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |


बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २१ डिसेंबर, १९५४


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचा कारभार

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या १९५३–५४ च्या हिशेबावरील कंट्रोलर व ऑडिटर जनरल ऑफ इंडियाचा ऑडिट रिपोर्ट लोकसभेस आणि राज्यसभेस १३ डिसेंबर रोजीं सादर करण्यांत आला. ह्या अहवालावरून असें दिसतें, कीं कॉर्पोरेशनच्या मॅनेजिंग डायरेक्टरानें त्याच्या अधिकाराच्या बाहेरील अधिकार वापरून व्याजाचे दर बदलले, कर्जाच्या अटी बदलल्या, शेअरभांडवल किंवा डिबेंचर्स वरवर पहातां शक्य दिसत असतांना कर्जे दिलीं, धोका पत्करणें इष्ट नाहीं, अशा फर्म्सना कर्जे देण्यांत आलीं. कांहीं प्रकरणांत, व्यापार व उद्योग खात्याच्या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यांत आलें. कॉर्पोरेशन तोट्यांत चालत आहे आणि किमान डिव्हिडंड वाटण्यासाठीं सरकारी गॅरंटीच्या सवलतीचा फायदा घेण्यांत येत आहे, अशा वेळीं ऑफिसच्या इमारतीची ६४ लक्ष रुपयांची योजना कॉर्पोरेशननें अमलांत आणण्यास प्रारंभ केला आहे. ह्यासंबंधांतील प्राथमिक कार्यांत कॉर्पोरेशनला ६ लक्ष रुपयांचा तोटा येण्याचा संभव आहे. कॉर्पोरेशनच्या कारभारांतील वाढीच्या मानानें व्यवस्था-खर्चात बेसुमार वाढ झालेली आहे. झालेल्या चुका व अधिकारा-बाहेरील वर्तन इं. फि. कॉर्पोरेशन चौकशी कमिटीनें व ऑडिटनें नजरेस आणल्यानंतर, कॉर्पोरेशननें ऑक्टोबर, १९५४ मध्यें ठराव करून घडलेल्या मागील सर्व गोष्टींस संमति दिली. सरकारच्या अधिकारांतील बाबी स्पष्ट करणारे नियम सरकारनें अद्याप तयार केलेले नाहींत; पण कॉर्पोरेशननें ज्या बाबी सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यास हव्या होत्या, त्याबाबत तिनें स्वतःच जबाबदाऱ्या पत्करल्या आहेत आणि निर्णय घेतले आहेत. कर्जाच्या रकमेचा विनियोग कोणत्या प्रकारें करावा, मॅनेजिंग एजन्सी करारांतील वैयक्तिक गॅरंटी, विम्याची व्यवस्था, डायरेक्टरांची नेमणूक, परतफेडीच्या अटी, इत्यादि बाबतींत मॅनेजिंग डायरेक्टरानें तारतम्याचे व्यापक अधिकार उपयोगांत आणलेले आहेत. गहाणखत करण्यापूर्वी आणि कर्जाची रक्कम देण्यापूर्वी ह्या बाबतींतील अटी मॅनेजिंग डायरेक्टर ठरवीत असत व एक्झिक्युटिव्ह कमिटीकडे त्याचा अहवाल पाठविला जात नसे. सोदपूर ग्लास वर्क्स लि. ला एक्झिक्यूटिव्ह कमिटीनें आणखी सात लक्ष रुपयांचें कर्ज मंजूर केलें. कॉर्पोरेशनची मंजुरी कंपनीला कळवितांना, मॅनेजिंग डायरेक्टरानें स्वतःच्या जबाबदारीवर नव्या अटी कंपनीवर लादल्या. प्रीमिअर ऑटोमोबाइल्सला ५० लक्ष रुपयांचें कर्ज मशिनरी व इमारत ह्यांसाठीं मंजूर करण्यांत आलें, पण कॉर्पोरेशननें त्यांतील १० लक्ष रुपये खेळत्या भांडवलाला वापरण्याची कंपनीला परवानगी दिली. खर्चात काटकसर करून मूळ मंजुरीच्या रकमेंत सर्व योजना पुरी करण्याचें कंपनीनें आश्वासन दिलें. कर्जाचा हा मोठा भाग दुसऱ्या कामाकडे वळविणें, ही गोष्ट कर्जाच्या स्वरूपांत मोठा बदल करणारी झाली, असें समजलें पाहिजे. वास्तविक कंपनीच्या पुनर्योजनेची तपासणी तज्ज्ञांकरवीं होणें जरूर होतें, पण कॉर्पोरेशननें तज्ज्ञाचा सल्ला घेतलेला दिसत नाहीं.

मॅनेजिंग एजंट्स किंवा बँका ह्यांचेकडून घेतलेल्या कर्जाच्या फेडीसाठीं केवळ कॉर्पोरेशन कर्ज देत नसे. पण कॉर्पोरेशनच्या कर्जदार कंपन्यांना ह्या जुन्या कर्जाचा कांहीं भाग परत फेडण्याची सवलत देण्यांत आली. कर्ज देतेवेळीं, ५०% पेक्षा मार्जिन कमी असल्याचे बरेच प्रकार दिसून आले. त्याला कॉर्पोरेशनचें उत्तर असें, कीं कर्जाच्या रकमेंतून कंपन्या जिंदगी निर्माण करतील व जिंदगीची किंमत वाढून मार्जिन आपोआप ५०% चे वर जाईल. कर्जाच्या अटींतील सर्वांत महत्त्वाची अट म्हणजे व्याजाचा दर. एकाच दिवशीं व एकाच सुमारास मंजूर केलेल्या कर्जांस वेगवेगळे व्याजाचे दर लागू करण्यांत आले; ह्या फरकांचीं कारणें नमूद केलेलीं नाहींत. कॉर्पोरेशनच्या हितसंबंधांचें संरक्षण करण्यासाठी कर्जदार कंपनीच्या बोर्डावर डायरेक्टर नेमण्याचा कॉर्पोरेशनचा अधिकार राहील अशी अट कर्जनाम्यांत असते. पण बेंगॉल पॉटरीजच्या गहाणखतांत ही अट घालण्यांत आली नाहीं. कॉर्पोरेशनचा खर्च सालोसाल वाढत चालला आहे. जून, १९५३ अखेरच्या वर्षांत तो ६१ हजारांनीं वाढला आणि जून, १९५४ अखेरच्या वर्षांत त्यांत आणखी ६३ हजारांची वाढ झाली. कर्जाचीं खातीं वाढत आहेत व कंपन्या कर्जाचे हप्ते व व्याज ह्या बाबतींत दिरंगाई करतात त्यामुळें कॉर्पोरेशनचें काम वाढलें आहे. पण नवे अर्ज मात्र कमी कमी येत आहेत. कॉर्पोरेशनच्या स्थापनेपासून ३० जून, १९५४ अखेर कॉर्पोरेशननें १०९ कंपन्यांना २० कोटी, ७४ लक्ष रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं. त्यांपैकीं फक्त ७० कंपन्यांनीं कर्जें प्रत्यक्ष घेतलीं. अशा कर्जाची रक्कम १२ कोटी, ८९ लक्ष रु. भरली. ३० जून, १९५४ अखेर १३,४८,८४१ रु. व्याज थकलेलें आहे आणि २८,८५,८१५ रु. मुद्दलाचे हप्ते थकलेले आहेत.

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या कामकाजाची चौकशी श्रीमति सुचेता कृपलानी ह्यांच्या अध्यक्षत्वाखालील समितीनें गेल्या वर्षअखेर केली होती. त्या अहवालावर संचालकमंडळाचे अध्यक्ष, सर श्रीराम, ह्यांनीं खालीलप्रमाणें विचार व्यक्त केले होते:—दिलेल्या कर्जाचें वाजवी तारण आणि औद्योगिक विकास घडवून आणण्याचें कर्तव्य ह्यांचा योग्य मेळ घालण्याचें अवघड काम इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनला करावें लागतें. कॉर्पोरेशनच्या संचालकमंडळाचे सदस्य हे मोठी जबाबदारी घेऊन व्यवसाय करणारे महत्त्वाचे गृहस्थ आहेत; त्यांतील कांहीं प्रमुख उद्योगपती आहेत; कांहीं बँकर व विमाव्यवसायी आहेत; कांहीं सरकारी अधिकारी आहेत. स्वतःचा मूल्यवान वेळ खर्च करून ते कॉर्पोरेशनच्या कामांत दक्षतेनें लक्ष घालीत आहेत आणि त्यांच्या मदतीचा अतिशय मोठा उपयोग होत आहे. कर्जमंजुरी किंवा नामंजुरी ह्या दोन्ही बाबतींत आतांपर्यंतचे सर्व ठराव एकमतानें झालेले आहेत.”

कॉर्पोरेशनविरुद्ध लांचबाजीचे व वशिलेबाजीचे आरोप

करण्यांत आले होते, ते सिद्ध झाले नसल्याचें समितीचें मत सरकारनें मान्य केलेलें आहे. तथापि, कांहीं बाबतींत समितीनें प्रतिकूल मत व्यक्त केलें होतें कंट्रोलर व ऑडिटर जनरलचा आतां प्रसिद्ध झालेला अहवाल समाधानकारक वाटणार नाहीं हें खरें असलें तरी कॉर्पोरेशनच्या कार्याची कल्पना असणारांना चालकांबद्दल सहानुभूति वाटल्याविना राहणार नाहीं. औद्योगिक विकास घडवून आणण्याचे दृष्टीनें कॉर्पोरेशननें कांहीं फर्म्सना जरा सवलत दिली, तर तिचा विपर्यास होण्याचा संभव असतो; परंतु शुद्ध हेतूनें केलेल्या गोष्टींबाबत इष्टानिष्टतेचा निवाडा करतांना तारतम्य वापरणेंच श्रेयस्कर असतें. कारखाना चालू ठेवून त्याला अडचणींतून बाहेर पडण्याची संधि देण्यासाठी केलेली उपाययोजना व्यवहारी लोकांना चुकीची वाटणार नाहीं; ऑडिटचा अहवाल मात्र तांत्रिक दृष्टीनेंच त्याच्याकडे पहाणार हें उघड आहे. इं. फि. कॉर्पोरेशनच्या कारभाकडे ह्याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. केवळ तारण पाहून कर्ज देणारी व तारण अपुरें पडलें किंवा फर्मला तात्कालिक अडचण आली, कीं दिलेलें कर्ज वसूल करण्याची त्वरा करणारी, असें इं. फि. कॉर्पोरेशनचें स्वरूप प्रारंभीं तरी रहाणें अशक्य आहे, आणि प्रारंभींच्या सद्बुद्धीनें केलेल्या गोष्टी, चुका ठरणें क्रमप्राप्त आहे.

---

### भारतांत येणारे परदेशी प्रवासी

परदेशी प्रवाशांनीं भारतांत यावें म्हणून मध्यवर्ती सरकारतर्फे प्रयत्न करण्यांत येत असतात. गेल्या वर्षी परदेशांतून भारतांत ३० हजार हौशी प्रवासी आले व त्यांनीं देशांत जवळ जवळ ३॥ कोटी रुपये खर्च केले, अशी माहिती अधिकृत रीत्या प्रसिद्ध करण्यांत आली आहे. परदेशीय प्रवाशांना आकर्षून घेण्याविषयीं अलीकडे सर्वच देशांत स्पर्धा झालेली दिसून येते. भारतांत पहाण्यासारखीं आकर्षक ठिकाणें पुष्कळ आहेत हें खरें. पण वरील स्पर्धेमुळें, आणि भारत ह्या 'व्यवसायांत' नव्यानें शिरलेला असल्यामुळें ह्या बाबतींतील यश सोपें मात्र राहिलेलें नाहीं. परकीय प्रवाशांना भारताकडे आकृष्ट करण्यासाठी प्रसिद्धीवर व प्रचारावर जो पैसा खर्च केला जातो, त्यासंबंधीं पुष्कळदां आक्षेप घेण्यांत येतात. तथापि, परदेशीय प्रवासी भारतांत आल्यामुळें पुष्कळशा धंद्यांना मदत होते ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं. भारताबद्दल परदेशीय लोकांत अजूनहि बरेच गैरसमज आढळून येतात. त्यांचें निराकारण करण्यासाहि परदेशीय प्रवाशांचा अनायासा उपयोग होतो. परकीय प्रवाशांना आकर्षून घेण्यासाठी इजिप्तनें जोराचे प्रयत्न चालविले आहेत इजिप्तचे माजी राजे फरूक ह्यांच्या राजवाड्यांत अद्यावत् पद्धतीचें द्यूतगृह बांधण्यांत येणार आहे. हा राजवाडा हौशी प्रवाशांसाठी सुखसोयींनीं अधिक सुसज्ज करण्याचें काम एका इटालियन कंपनीला देण्यांत आलें आहे. नवविवाहित दांपत्यांना आपला मधुचंद्र साजरा करण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावर कांहीं खास गृहेंहि बांधण्यांत येणार आहेत. भारतांतहि प्रवाशांना रमणीय वाटतील अशीं पुष्कळ ठिकाणें आहेत. त्यांचा योग्य तऱ्हेनें उपयोग करून घेण्यांत यावा, असें सुचविण्यांत येत आहे.

---

**सिल्क वेस्टची निर्यात**—१९५५ च्या जूनअखेरपर्यंत मद्रास व म्हैसूर येथील कारखान्यांतील २ लाख पौंड वजनाच्या सिल्क वेस्टच्या निर्यातीस परवानगी देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. निर्यातीसाठी लागणारा परवाना मिळविण्याची पद्धत लवकरच जाहीर करण्यांत येणार आहे.


स्थापना सन १९३५ टे. नं. २४५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |


★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी.,
( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

## किर्लोस्कर

## 'कल्याण' पॉवर शेंगायंत्र




हें यंत्र चालविण्यास ६/८ अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दरेक तासास ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जाते.

या शिवाय कल्याण हात आणि पॉवर शेंगायंत्र आणि कॉटेज शेंगायंत्र हीं लहान यंत्रें मिळतात. गरजेनुरूप आणि पसंतीनुरूप निवड करा.

—सविस्तर माहिती मागवा—

**किर्लोस्कर बंधु लि.**

**किर्लोस्करवाडी, द. सातारा.**

## हिंदी बँकांचा भारताबाहेरील व्यवहार

### १९५३ मधील कामाचा आढावा

हिंदी बँकिंगच्या भारताबाहेरील प्रसाराकडे आपण मोठ्या कुतूहलानें पहात असतों. कारण, ब्रिटिश बँकांनीं जगभर जाळें कसें पसरलें व त्याचा त्यांच्या व्यापाराला आणि आर्थिक उद्धाराला कसा उपयोग झाला, हें आपणांस माहीत आहे. त्याचप्रमाणें भारतामधील बँकिंगमध्यें विदेशी बँकांचें केवढेंतरी महत्त्वाचें स्थान आहे, ह्याचीहि संबंधित लोकांना पूर्ण कल्पना आहे. अशा परिस्थितींत हिंदी, बँकांचें जाळें परदेशांत वाढणें श्रेयस्कर होईल. तथापि, हिंदी बँकांच्या व्यवहारास परदेशांत पुरेसा जोम लागलेला दिसत नाहीं. ह्याचें मुख्य कारण, प्रारंभींच्या काळांत भारतांतील मुख्य कचेऱ्यांकडून जेवढी मदत एकसारखी मिळावयास हवी तेवढी मिळण्याजोगी परिस्थिति कदाचित् नसावी, असें अनुमान काढतां येईल. हिंदी बँकांचें अंतर्गत सामर्थ्य वाढण्यावरच अखेर त्यांची परदेशांतील प्रगति अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे; त्यांच्या वाढीस लागणारा जीवनरस येथूनच पुरविला गेला पाहिजे.

भारताबाहेर व्यवहार करणाऱ्या एकूण बँकांची संख्या सालोसाल घटत आहे; पाकिस्तानांतच ती घट विशेषेंकरून अनुभवास येत आहे. तथापि, पाकिस्तानांतील हिंदी बँकांची संख्या घटूनहि त्यांचा व्यवहार थोडासा वाढलेला आढळतो. पाकिस्तानाबाहेरील हिंदी बँकांच्या कचेऱ्या वाढल्या, तरी त्यांच्या व्यवहारांत घट अनुभवास आली. सिलोन आणि जपान येथें घट सर्वांत जास्त झाली. मलायांतील व्यवहार कायम राहिला, तर बर्मा, थायलंड व हाँगकाँग येथील व्यवहार वाढला. १९५३ मधील महत्त्वाची घटना म्हणजे ब्रिटिश पूर्वआफ्रिकेंत ४, एडन येथें १ व ग्रेटब्रिटनमध्यें २ कचेऱ्या उघडण्यांत आल्या.

१९५३ अखेर २४ शेडचूल्ड व ८ बिगर-शेडचूल्ड बँका ११ परदेशांत व्यवहार करीत होत्या. परदेशांत त्यांच्या एकूण १०६ कचेऱ्या होत्या, त्यांपैकी ९५ कचेऱ्या शेडचूल्ड बँकांच्या होत्या. बिगर-शेडचूल्ड बँकांच्या सर्व म्हणजे ११ शाखा एकट्या पाकिस्तानांतच होत्या. परदेशांतील सर्व कचेऱ्यांकडे मिळून ६७ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या, व त्यांनीं एकूण ३६ कोटी रुपयांचीं कर्जें दिलेलीं होतीं. हिंदी बँकांच्या परदेशांतील देण्यांपैकी ५४% देणीं पाकिस्तानांत आहेत. ग्रेटब्रिटनमधील कचेऱ्यांकडील ठेवींत एक कोटीची घटच झालेली आढळते.

---

### कॉमन्स सभेंतील वडीलकीचा मान

सर विन्स्टन चर्चिल ह्यांनीं गेल्या २९ ऑक्टोबर रोजीं पार्लमेंटच्या सभासदत्वाचीं ओळीनें तीस वर्षें पुरी केलीं. २९ ऑक्टोबर, १९२४ पासून ते एकाच मतदारसंघांतून सतत निवडून आले आहेत. मि. डी. आर. ग्रेनफेल हे त्यांच्या मतदारसंघांतून जुरें, १९२२ पासून सतत निवडून आले आहेत; त्यांच्याकडेच कॉमन्स सभागृहांत वडीलकीचा मान आहे.

---

### दोन बँकांचें एकीकरण

पंचमहाल जिल्ह्यांतील बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या शाखा बंद करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. सेवानिवृत्त जॉइंट रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज श्री. रतिलाल त्रिवेदी ह्यांनीं जिल्ह्यांतील दोन बँकांचें एकीकरण करावें असें सुचविलें होतें. त्या सुचनेस अनुसरून वरील निर्णय घेण्यांत आला.

### हिंदी बँका व त्यांच्या परदेशांतील शाखा

| बँका | कचेऱ्या |
|---|---|
| ( शेडयूल्ड बँका ) | |
| १. अलाहाबाद् बँक | २ |
| २. बँक ऑफ बरोडा | २ |
| ३. बँक ऑफ इंडिया | ८ |
| ४. कॅनरा बँक | १ |
| ५. सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १४ |
| ६. हिंद् बँक | १ |
| ७. हिंदुस्थान क. बँक | १ |
| ८. इंपीरिअल बँक | १२ |
| ९. इंडियन बँक | ५ |
| १०. इंडियन ओव्हरसीज बँक | १० |
| ११. लक्ष्मी क. बँक | १ |
| १२. मेट्रोपालिटन बँक | १ |
| १३. नॅशनल बँक ऑफ लाहोर | १ |
| १४. न्यू बँक ऑफ इंडिया | १ |
| १५. ओरिएंट बँक ऑफ कॉमर्स | १ |
| १६. प्रभात बँक | १ |
| १७. पंजाब अँड सिंध बँक | १ |
| १८. पंजाब को. बँक | १ |
| १९. पंजाप नॅशनल बँक | ३ |
| २०. सदर्न बँक | १ |
| २१. ट्रेडर्स बँक | १ |
| २२. युनायटेड बँक ऑफ इंडिया | १४ |
| २३. युनायटेड कमर्शिअल बँक | ११ |
| २४. युनायटेड इ. बँक | १ |
| | ९५ |
| ( बिगर शेडयूल्ड बँका ) | |
| १. कमर्शिअल बँक ऑफ इंडिया | १ |
| २. फेडरेशन बँक | १ |
| ३. फ्रॉंटियर बँक | १ |
| ४. महालक्ष्मी बँक | ३ |
| ५. नॅशनल सिटी बँक | १ |
| ६. न्यू बेंगाल बँक | १ |
| ७ प्रवर्तक बँक | २ |
| ८. सिल्हेट कमर्शिअल बँक | १ |
| | ११ |

### शाखांची देशवार विभागणी

| बँका | कचेऱ्या |
|---|---|
| **एडन** | |
| १. बँक ऑफ इंडिया | १ |
| **ब्रिटिश पूर्व आफ्रिका** | |
| १. बँक ऑफ बरोडा | २ |
| २. बँक ऑफ इंडिया | २ |
| **बर्मा** | |
| १. सेंट्रल बँक | १ |
| २. इंपीरियल बँक | १ |
| ३. इं. ओव्हरसीज बँक | १ |
| ४. पंजाब नॅशनल बँक | १ |
| ५. यु. कमर्शिअल बँक | ४ |
| **सिलोन** | |
| १. इंपीरिअल बँक | १ |
| २. इंडियन बँक | १ |
| ३. इं. ओव्हरसीज बँक | १ |
| **फ्रेंच इंडिया** | |
| १. इं. ओव्हरसीज बँक | २ |
| २. यु. कमर्शिअल बँक | १ |
| **हॉंगकॉंग** | |
| १. यु. कमर्शिअल बँक | १ |
| **जपान** | |
| १. बँक ऑफ इंडिया | २ |
| **मलाया** | |
| १. बँक ऑफ इंडिया | १ |
| २. इंडियन बँक | ४ |
| ३. इं. ओव्हरसीज बँक | ५ |
| ४. यु. कमर्शिअल बँक | २ |
| **पाकिस्तान** | |
| ( शेडयूल्ड बँका ) | |
| १. अलाहाबाद् बँक | २ |
| २. बँक ऑफ इंडिया | १ |
| ३. कॅनरा बँक | १ |
| ४. सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १२ |
| ५. हिंद् बँक | १ |
| ६. हिंदुस्तान कमर्शिअल बँक | १ |
| ७. इंपीरिअल बँक ऑफ इंडिया | ९ |
| ८. लक्ष्मी क. बँक | १ |
| ९. मेट्रोपालिटन बँक | १ |
| १०. नॅशनल बँक ऑफ लाहोर | १ |
| ११. न्यू बँक ऑफ इंडिया | १ |
| १२. ओरिएंट बँक ऑफ कॉमर्स | १ |
| १३. प्रभात बँक | १ |
| १४. पंजाब अँड सिंध बँक | १ |
| १५. पंजाब को. बँक | १ |
| १६. पंजाब नॅ. बँक | २ |
| १७. सदर्न बँक | १ |
| १८. ट्रेडर्स बँक | १ |
| १९. युनायटेड बँक ऑफ इंडिया | १४ |
| २०. यु. क. बँक | २ |
| २१. यु. इं. बँक | १ |
| ( बिगर शेडयूल्ड बँका ) | |
| १ कमर्शिअल बँक ऑफ इंडिया | १ |
| २, फेडरेशन बँक ऑफ इंडिया | १ |
| ३. फ्रॉंटियर बँक | १ |
| ४. महालक्ष्मी बँक | ३ |
| ५. नॅशनल सिटी बँक | १ |
| ६. न्यू बेंगॉल बँक | १ |
| ७. प्रवर्तक बँक | २ |
| ८. सिल्हेट क. बँक | १ |
| **थाइलंड** | |
| १. इं. ओव्हरसीज बँक | १ |
| **ग्रेट ब्रिटन** | |
| १. बँक ऑफ इंडिया | १ |
| २. सेंट्रल बँक | १ |
| ३. इंपीरियल बँक | १ |
| ४. यु. कमर्शिअल बँक | १ |

## किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.

( मॅनेजिंग एजंट्स् : मेसर्स किर्लोस्कर सन्स आणि कं. )

वरील कंपनीची आठवी वार्षिक सभा दि. १३ रोजीं झाली. कंपनीला, ३१-३-५४ अखेरच्या आठव्या वर्षी घसारा न काढतां ३०,०१,५८३ रु. च्या विक्रींतून १,१८,१२४ रु. नफा झाला आहे. कंपनीच्या ताळेबंदांत जिंदगीचे बाजूस ९,००,४४४ रु. तोटा शिल्लक आहे, त्यांतून हा नफा वजा जातां ७,८२,३२० रु. तोटा आतां शिल्लक उरतो. अहवालाचें वर्ष ह्यापूर्वीच्या वर्षा-पक्षा कंपनीस चांगलें गेलें. लहान डिझेल इंजनांच्या आयातीस भारत सरकारनें बंदी केली, ती ह्या धंद्यास उपकारक ठरली. आयात केलेल्या इंजनांचा देशांतील सांठा अद्याप बराच मोठा होता, तरी कंपनीच्या इंजनांना चांगली मागणी आली. आयात केलेल्या इंजनांचा देशांतील सांठा आतां कमी झाला आहे, ही आनंदाची बाब आहे. ऑगस्ट, १९५३ पासून कारखाना पूर्ववत चालू आहे. जुलै, १९५३ मध्यें कंपनीनें बाजारांत आणलेलें ५ बी. एच. पी. किर्लोस्कर इंजिन गिऱ्हाइकांना पसंत पडलें आहे. कंपनीनें आपलीं देणीं कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न चालविला आहे. ऑक्टोबर, १९५२ मध्यें इं. फि. कॉर्पोरेशनकडून घेतलेल्या ५ लक्ष रुपयांच्या कर्जापैकीं मार्च, १९५४ अखेर २ लक्ष रु. फेडलें आहेत. एप्रिल, १९५४ पासून उत्पादन आणि विक्री दोन्ही समाधानकारक आहेत आणि चालू वर्ष कंपनीला चांगलें जाईल अशी अपेक्षा आहे. मॅनेजिंग एजंटांनीं ३१ मार्च, १९५४ अखेरचा आपला दरमहा १,५०० रु. चा ऑफिस अलावन्स सोडला आहे, त्याबद्दल डायरेक्टरांनीं भागीदारांचेतर्फे त्यांचे मनःपूर्वक आभार मानलें आहेत.

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | २४,०७,४९० | जमीन | ७,०७,७६४ |
| रिझर्व्ह फंड | २,००,३६४ | इमारती | ९,५४,७०६ |
| घसारा फंड | ७,८५,२९२ | यंत्रसामुग्री | १८,६५,१२९ |
| कर्जे | ३३,७९,८४९ | स्टॉक | २६,५४,७९० |
| इतर देणीं | १४,६७,४७६ | येणीं | ९,६८,५९९ |

---

### ब्रिटिश शास्त्रज्ञाचा इषारा

ब्रिटनमधील सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ मि. जे. डी. बर्नाल्ड हे चीनचा दौरा करून भारताच्या मार्गानें परत जात आहेत. चीनमधील त्यांचा दौरा दोन महिनेपर्यंत चालला होता. दौऱ्याविषयींची माहिती वृत्तपत्रप्रतिनिधींना देतांना त्यांनीं भारताला महत्त्वाचा इषारा दिला आहे. पत्रकार-परिषदेंत दौऱ्याविषयीं माहिती सांगतांना ते म्हणाले, कीं औद्योगिक प्रगतीच्या बाबतींत भारताला चीनच्या मागें रहावयाचें नसेल तर भारतानें अधिक तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ आणि एंजिनिअर्स शिकवून तयार केले पाहिजेत. चीननें पोलाद-लोखंडासारखे अवजड उद्योगधंदे उभारण्याच्या कामीं गेल्या कांहीं वर्षांत फार जलद प्रगति केलेली आहे. ह्या धंद्यापुरतेंच बोलावयाचें झाल्यास चीन लवकरच ह्या बाबतींत मोठ्या राष्ट्रांच्या मालिकेपैकीं एक होईल, असा भरंवसा वाटतो. राष्ट्राच्या आर्थिक जीवनाला मूलभूत असणारे जे उद्योगधंदे आहेत त्यांच्या बाबतींत आपला देश स्वयंपूर्ण करण्यासाठीं चीनमध्यें अत्यंत कसोशीनें प्रयत्न करण्यांत येत आहेत. आनशान येथें बांधण्यांत आलेला नवा पोलादाचा कारखाना भारतामधील जमशेटपूर येथील कारखान्या-सारखाच आहे. परंतु ह्या कारखान्यांतील उत्पादन मात्र जमशेटपूरच्या कारखान्यापेक्षा अधिक आहे. भारतांतील पोलादा-च्या उत्पादनापेक्षा चीनचें पोलादाचें उत्पादन लवकरच अधिक होईल असा संभव दिसतो. भारताच्या आर्थिक व औद्योगिक विकासासंबंधीं बोलतांना ते म्हणाले, कीं कांहीं भारतीयांशीं केलेल्या चर्चेवरून भारताचे विकासाचे कार्यक्रम योग्य दिशेनें प्रगति करीत आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

### चहाच्या वाढत्या किंमती व राजकारण

ब्रिटनमध्यें चहाच्या किंमती एकसारख्या वाढूं लागल्यामुळें राजकारणावर त्याचा परिणाम होऊं लागला आहे. १९५२ च्या ऑक्टोबर महिन्यापासून ब्रिटनमध्यें चहाच्या किंमतींवरील निर्बंध काढण्यांत आले व त्याचें वाटपहि रद्द करण्यांत आलें. तेव्हांपासून चहाच्या किंमती एकसारख्या वाढतच गेल्या. चहाचें वांटप होत असतांना त्याची किंमत दर पौंडाला ३ शिलिंग ८ पेन्स अशी होती. ती वाढतां वाढतां आतां दर पौंडाला ७ शिलिंग इतकी किंमत पडूं लागली आहे आणि त्यामुळें किंमतीचा प्रश्न हा ब्रिटिश राजकारणांतील एक गंभीर स्वरूपाचा प्रश्न बनूं पहात आहे. ह्या वर्षांतच चहाच्या किंमतींत ५ वेळां वाढ झाल्याचें दिसून आलें आणि त्यामुळें ब्रिटनमधील लोकांत बरेंच असमाधान पसरलें आहे. ब्रिटनच्या हुजुरपक्षीय सरकारपुढें ही एक गंभीर समस्याच उत्पन्न झाली आहे. कारण पुढील निवडणुकींत त्या पक्षाला यश मिळणें अगर न मिळणें रहाणीचा निर्देशांक तें किती खाली राखूं शकेल त्यावर अवलंबून आहे. हुजुरपक्षाचे राजकीय विरोधक जे सोशॅलिस्ट, ते चहाच्या चढत्या किंमती-कडे बोट दाखवून असें म्हणत आहेत कीं वस्तूंवरील किंमतीचें नियंत्रण रद्द करून खाजगी व्यापारधंद्याला वाव दिला, कीं काय होतें तें चहाच्या किंमतीवरून दिसतच आहे. ब्रिटनमधील गृहिणींना आपली पैशाची पिशवी खरवडून चहासाठीं अधिक किंमत द्यावी लागत आहे, आणि त्याचवेळीं चहा कंपन्यांचा नफा लक्षावधि पौंडांनीं वाढत आहे. ह्या उघड दिसणाऱ्या परिस्थितीमुळें तर वातावरण अधिकच धूसर झालें आहे.

---

### आई "चुकीच्या" अर्भकावर प्रेम करूं शकते का ?

फॉरेस्ट गेट इस्पितळांतील एका चुकीमुळें दोन माता चुकीच्या मुलांचें संगोपन करीत आहेत, ह्याबद्दल खेद व्यक्त करणारें पत्रक वेस्टहॅम ग्रुप हॉस्पिटल मॅनेजमेंट कमिटीच्या चेअरमननें काढलें आहे. जन्मल्याबरोबर अर्भकाच्या मनगटाभोंवतीं नांवाचें लेबल बांधलें जातें व दुसरें लेबल त्याच्या खाटेला बांधण्यांत येतें. खाटेवरील लेबलावर विश्वास ठेवून आणि मनगटावरील लेबल न पहातां मुलांची जोपासना चालू होती. एका आईची इस्पितळांतून जाण्याची वेळ आली, तेव्हां हा घोटाळा उघडकीस आला. पण दोन्ही आयांचा आग्रह पडला, कीं त्यांचेजवळील मूल त्यांचेंच आहे ! दोन्ही मुलांच्या आईबापांच्या संमतीनें, तीन वेगवेगळ्या इस्पितळांत रक्ततपासणी करविण्यांत आली, तेव्हां असें सिद्ध झालें, कीं दोहोंपैकीं कोणत्याच आईजवळचें मूल तिचें किंवा तिच्या पतीपासून झालेलें असणें शक्य नाहीं. म्हणजे, मुलांची अदलाबदल झाली हें स्पष्ट झालें. तेव्हां, पुढें काय करावयाचें, हें पालकांवरच सोंपविण्यांत आलें. दोन्ही आयांचें म्हणणें, रक्ताची तपासणी कांहींहि सांगो, त्यांचे जवळील मूल हेंच खरें त्यांचें; बाप मात्र मुलाच्या मनगटावरील लेबलावर व रक्ताच्या तपासणीवर विश्वास ठेवण्यास तयार झाले. पण उपयोग काय ? कांहीं काळ तरी मुलांची अदलाबदल न करण्याचें त्यांनीं मान्य केलें आहे. मुलें बदललीं गेलीं आहेत, ह्याची कमिटीची मात्र खात्री झाली आहे.

## साखर-कारखान्यांना एकच प्रकारची प्रॉव्हिडंट फंड योजना लागू

### इंडस्ट्रिअल कोर्टाचा निकाल

दख्खन भागांतील आठ साखर-कारखान्यांना एकच प्रकारची प्रॉव्हिडंट योजना लागू करण्यांत यावी असा इंडस्ट्रिअल कोर्टानें ( मुंबई ) जो निकाल दिला तो मुंबई सरकारच्या ता. २ डिसेंबर १९५४ च्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाला आहे. ही योजना दि. १ एप्रिल १९५५ पासून अंमलांत यावयाची आहे. बेलापूर कंपनी लि. ( हरेगांव ), महाराष्ट्र शुगर मिल्स लि. ( टिळकनगर ), गोदावरी शुगर मिल्स ( लक्ष्मीवाडी ), गोदावरी शुगर मिल्स लि. ( साखरवाडी ), बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट ( श्रीपूर ), चांगदेव शुगर मिल्स ( चांगदेव नगर ), फलटण शुगर वर्क्स लि. ( साखरवाडी ) आणि कोल्हापूर शुगर मिल्स ( कोल्हापूर ) ह्यांना हा निर्णय लागू करण्यांत आला आहे. कामगारानें आपल्या पगार-महागाईचा रुपयाला १६ पै एवढा हिस्सा ह्या प्रॉव्हिडंट फंडासाठीं द्यावा व मालकांनीं तेवढाच हिस्सा प्रत्येक कामगारा-मागें द्यावा असा निवाडा कोर्टानें दिला आहे.

महिन्याच्या पगाराच्या यादीवर असणाऱ्या व ज्यांचा पगार दरमहा २० रु. किंवा अधिक असेल अशा कामगारांनाच ही योजना लागू करावी अशी मागणी कामगारांतर्फे करण्यांत आली होती. ती कोर्टानें मान्य केली आहे. प्रॉव्हिडंट फंडाच्या विश्वस्त मंडळावर कामगारांचे प्रतिनिधी योग्य त्या प्रमाणांत घेण्याची शिफारस कोर्टानें केली आहे.

सध्यां कांहीं साखर-कारखान्यांत ज्या प्रॉव्हिडंट फंडाच्या योजना चालू असतील त्या ह्या निकालानुसार पुन्हां संघटित करण्यांत याव्यांत म्हणजे सर्व साखर-कारखान्यांत एकच प्रकारची योजना अंमलांत येईल असें कोर्टानें म्हटलें आहे. भारत सरकारनें औद्योगिक कामगारांसाठीं प्रॉव्हिडंट फंड योजनेचे जे आदर्श नियम तयार केले आहेत त्यानुसारच शक्य तों काम चालावें असें औद्योगिक कोर्टानें आपल्या निवाड्यांत नमूद केलें आहे.

## राष्ट्रीय भावना— मिशनऱ्यांचा शत्रु

भारतांतील मिशनऱ्यांना परदेशांतून जानेवारी, १९५० ते जून, १९५४ ह्या मुदतींत २९ कोटी, २७ लक्ष रु. मिळाले, अशी माहिती अधिकृत रीत्या सांगण्यांत आली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मिशनऱ्यांच्या कार्यास अधिकच वाव मिळाला, पण आतां त्यांच्यावर बंधनें घालण्यांत यावीं, अशी मागणी येऊं लागली आहे. जुनीं मिशन्सें अमेरिकेंतील इतर पंथीयांच्या हालचालींविरुद्ध तक्रार करीत आहेत. "इस्लामिक रिपब्लिक" म्हणून जाहीर झालेल्या पाकिस्तानांत ख्रिस्ती मिशनऱ्यांना वाव मिळणें शक्य नाहीं. सिलोनमध्येंहि बुद्धधर्माचें आकर्षण वाढलें आहे. आफ्रिकेंत स्वातंत्र्योत्सुक झालेल्या देशांत ख्रिस्ती धर्म राजकारणापासून अलिप्त रहाणें अशक्य झालें आहे. कम्युनिझम, राष्ट्रीय भावना आणि पूर्वेकडील धर्माचें पुनरुज्जीवन हीं आजच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांचीं शत्रु बनलीं आहेत. चीनमध्यें ख्रिस्ती धर्मोपदेशकांना आतां वाव उरलेला नाहीं; पण इतर स्वायत्त देशांत मात्र अजून त्यांच्या कार्यास पूर्ण बंदी झालेली नाहीं. आशिया आणि आफ्रिका येथील लोकांच्या राजकीय आकांक्षांना मिशनऱ्यांचा विरोध नाहीं, ही गोष्ट स्पष्ट कशी करतां येईल, असा त्यांचेपुढें प्रश्न आहे, आणि तो सोडविणें सोपें नाहीं. कारण, परदेशांवरील राजकीय प्रभुत्त्व व मिशनऱ्यांचें कार्य हीं कमेकांशीं निगडित आहेत, असाच सर्वत्र समज आहे.

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या प्रतिनिधांचे संमेलन

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या पुणें शाखेंतील विमा प्रतिनिधींचें संमेलन रविवार ता. १२–१२–५४ रोजीं सायंकाळीं चार वाजतां कंपनीच्या इमारतींत वेस्टर्न इंडिया हाऊसमध्यें भरलें होतें. कंपनीचे कार्याध्यक्ष डॉ. मो. ना. आगाशे ह्यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. सभेस डायरेक्टरमंडळींपैकीं श्री. डी. पी. जोशी, श्री. रा. ना. गोडबोले व श्री. नरूभाऊ लिमये हीं मंडळी हजर होतीं.

कंपनीचे पुण्याचे शाखाधिकारी श्री. कृ. ग. खांडेकर ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत कार्याध्यक्षांचें व उपस्थितांचें स्वागत करून पुणें शाखेच्या प्रगतीचा थोडक्यांत अहवाल सादर केला. तसेंच पुणें शाखेंत करण्यांत आलेल्या कांहीं खास सोयींचा, पारितोषिकांच्या योजनेचा व शाखेच्या कामाशीं निगडित अशा कांहीं प्रश्नांचाहि त्यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख करून विमा-प्रतिनिधींच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर प्रतिनिधींपैकीं तिघांचीं भाषणें झालीं. श्री. शाळीग्राम ह्यांनीं खेड्यामध्यें विमा प्रसार करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली तर श्री. वर्तक ह्यांनीं वारसा कर व विमा ह्याबाबत उद्बोधक माहिती सांगितली. श्री. काणे ह्यांनीं वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या ध्येयवादी कार्यपद्धतीचा, श्रेष्ठ दर्जाचा व विमा-प्रतिनिधी व शाखा-कार्यालय ह्यामध्यें दिसून येणाऱ्या खेळीमेळीच्या संबंधाचा उल्लेख केला. त्यानंतर अध्यक्षांचें मुख्य भाषण झालें. त्यांनीं गेल्या वर्ष-दीड वर्षामध्यें भारतीय विमा जगतामध्यें घडलेल्या महत्त्वाच्या घटनांचा (उ. दर कपात, बोनस दर वाढ, वगैरेंचा) उल्लेख करून त्या प्रत्येक बाबतींत कंपनीनें आपल्या ध्येयधोरणाप्रमाणें कसा दक्षतेनें विचार केला ह्याचें साधार विवेचन अधिकारवाणीनें करून कंपनीच्या ध्येयवादी व शास्त्रीय विचारसरणीमुळें कंपनीची भावी प्रगति कशी निश्चित आहे तें दाखवून दिलें. विमा प्रतिनिधींनीं व्यक्त केलेल्या भावनाबद्दल समाधान व्यक्त करून त्यांचा आदर कसा केला जातो त्याचा त्यांनीं उल्लेख केला. नंतर अध्यक्षांना हारतुरे अर्पण करण्यांत येऊन त्यांचे व इतर उपस्थितांचे श्री. चिंतामणी आपटे ह्यांनीं आभार मानले. सौ. काशीकर ह्यांनीं वंदेमातरम् म्हटलें व सभेचें काम संपलें. नंतर उपस्थितांना अल्पोपहार देण्यांत आला.

## मुंबई राज्यांतील ट्रेड युनियन्स

१९४७ सालापासून मुंबई राज्यांत रजिस्टर्ड ट्रेड युनियनांची संख्या वाढत असून १९५२–५३ सालींहि हीच परिस्थिति कायम असल्याचें इंडियन ट्रेड युनियन कायद्याच्या अंमलबजावणीबाबतच्या वार्षिक अहवालावरून दिसतें. वर्षाच्या सुरुवातीस राज्यांत ६७२ युनियनांची नोंद करण्यांत आली होती; पण एका वर्षाच्या काळांत १०५ युनियनांचें रजिस्ट्रेशन रद्द करण्यांत आलें. यांपैकीं १०३ युनियनांनीं आपले वार्षिक तक्ते सादर केले नाहींत म्हणून व उरलेल्या दोन युनियनांनीं तशी मागणी केल्यामुळें त्यांचें रजिस्ट्रेशन रद्द करण्यांत आलें. अहवालाच्या सालांत १४५ नव्या युनियनांची नोंद करण्यांत आली. अशा रीतीनें सालअखेरीस नोंदविलेल्या ट्रेड युनियनांची संख्या ७१२ झाली.

संघटित प्रयत्नांनीं आपली परिस्थिति सुधारण्यासाठीं ट्रेड युनियनें स्थापण्याची गरज कामगारांना पडल्यामुळें ट्रेड युनियनांच्या संख्येंत वरीलप्रमाणें सतत वाढ झाली. अहवालाच्या सालांत नोंदविण्यांत आलेल्या ७१२ युनियनांपैकीं ६७३ राज्यव्यापी युनियनें व ३९ मध्यवर्ती युनियनें होतीं.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

—साखर-कारखाना म्हणजे महायुद्ध जिंकण्याचा पराक्रम नव्हे—

Sir Winston Churchill उवाच

"It Was The Nation And Race That Had The Lion Heart"

"I Only Roared"

Lion Heart :—" असाध्य तें साध्य करितां सायास "

Sheep Heart :—जात गोत न पहातां धनिकाला शेअर विकून सिंडिकेट धनिकाच्या स्वाधीन करा.

(१) नवीन हंगामाची साखर करण्यास सुरुवात केली आहे.

(२) याचें सर्व श्रेय Lion-Heart भागीदार व ठेवीदार यांना आहे.

(३) "Lion-Heart" ही महाराष्ट्राची इतिहासप्रसिद्ध परंपरा आहे. Lion-Heart वृद्ध शेलारमामा परत फिरणाऱ्या मावळ्यांना काय म्हणाला?

(४) कमिशनच्या लोभामुळें Sheep-heart "विद्या विभूषित" गैरसमज करून शेअर विका असें सिंडिकेटच्या भागीदारांना सांगत असतील.

(५) "देणगी नव्हे, गुरुदक्षिणा दिली आहे" असा आग्रह धरणारा शिष्य स्वतःच्या आदरणीय गुरुवर्यांविषयीं स्वतः अगर दुसऱ्या करवीं अनादराचा शब्द बोलणार नाहीं व लिहिणार नाहीं.

★

मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. ११ डिसेंबर १९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.